THE

# The Bombay Government Gazette.

Published by Authority.

SATURDAY, 20TH APRIL 1895.

☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालील आक्ट आलीजा गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १८९५ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९५ चा आक्ट ३ रा.

**हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, सन १८६४ चा आक्ट ६ वा आणि सन १८६६ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट, हे सुधारण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थी, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, सन १८६४ चा आक्ट ६ वा, आणि सन १८६६ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट, हे सुधारणें योग्य आहे, त्या अर्थी ह्यावरून पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

**हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा.**

सन १८६० चा आक्ट ४५, याच्या १८२ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

१. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या १८२ व्या कलमाच्या बदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे; तें येणेंप्रमाणें:—

सरकारी नौकरानें आपणास कायद्यावरून मिळालेल्या अधिकाराचा उपयोग दुसऱ्याचें नुकसान करण्यांत करावा या इरादानें त्यास खोटी खबर देणें.

"१८२. जो कोणी मनुष्य जी कोणतीही खबर खोटी असल्याचें आपणास माहीत असून किंवा वाटत असून ती कोणत्याही सरकारी नौकरास देईल व ती देण्यामध्यें त्याचा इरादा अशा सरकारी नौकरानें—

(अ) ज्या गोष्टीसंबंधीं अशी खबर दिली असेल त्या गोष्टीची खरी स्थिति त्याला समजली असतां जी गोष्ट त्यानें करूं नये किंवा वर्जूं नये तशी कोणतीही गोष्ट करावी किंवा वर्जावी, किंवा

(ब) त्यास कायद्यानें मिळालेल्या अधिकाराचा उपयोग त्यानें कोणत्याही मनुष्याचें नुकसान करण्याकडे किंवा कोणत्याही मनुष्यास त्रास देण्याकडे करावा,

असा असेल, किंवा आपण तशी खबर दिल्यानें त्या सरकारी नौकराकडून सदरीं सांगितल्याप्रमाणें घडून येण्याचा संभव आहे असें त्यास माहीत असेल, तर त्यास दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ही कैद सहा महिनेपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, किंवा त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे, व हा दंड एक हजार रुपयांपर्यंत करण्याचा अख़्त्यार आहे, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

"उदाहरणें.

"(अ) अ हा, एका माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील पोलीस अमलदार झ यानें आपल्या कामगिरीमध्यें हयगई केली किंवा त्यानें गैरवर्तणूक केली अशी त्या माजिस्ट्रेटास खबर देतो, आणि त्यास ही खबर खोटी असल्याचें व तिजवरून असा माजिस्ट्रेट झला दरतरफ करील असा संभव असल्याचें माहीत आहे. तर अनें या कलमांत सांगितलेला अपराध केला.

"(ब) अ हा झनें सरकारच्या मनाईचें मीठ एका गुप्त ठिकाणीं ठेविलें आहे अशी एका सरकारी नोकरास खोटी खबर देतो, आणि त्यास ही खबर खोटी असल्याचें व तिजवरून झच्या घरादाराचा झाडा घेतला जाऊन झला त्रास होण्याचा संभव असल्याचें माहीत आहे. तर अनें या कलमांत सांगितलेला अपराध केला.

"(क) अ हा अमुक गांवाजवळ कोणीं आपल्या आंगावर येऊन आपली चोरी केली ह्मणून एका पोलीसच्या शिपायास खोटी खबर देतो. आपल्या आंगावर येणारांमध्यें अमुक मनुष्य होता असें कोणत्याही मनुष्याचें नांव तो सांगत नाहीं, परंतु, अशी खबर दिल्यामुळें पोलिसाकडून सदरहू गांवामध्यें चौकशी करण्यांत येऊन व झाडा घेण्यांत येऊन त्याच्या योगानें तेथील गांवकऱ्यांस किंवा त्यांपैकीं कांहीं लोकांस त्रास पोंचण्याचा संभव आहे हें त्यास माहीत आहे. तर अनें या कलमाअन्वयें अपराध केला.

सन १८६० चा आक्ट ४५, याच्या १२ व्या बाबींत जास्त कलम दाखल करणें.

२. सदरहू कायद्याच्या १२ व्या बाबीच्या शेवटीं पुढील कलम दाखल केलें पाहिजे; तें येणेंप्रमाणें :—

खोट्या स्टांपाची मनाई.

"२६३ अ. (१) जो कोणी—

(अ) कोणताही खोटा स्टांप करील, जाणूनबुजून चालवील, त्याचा धंदा करील किंवा तो विकील किंवा कोणताही खोटा स्टांप टपालाच्या कोणत्याही कामाला जाणूनबुजून वापरील, किंवा

(ब) कोणताही खोटा स्टांप कायदेशीर सबबीवांचून आपल्या कबज्यांत ठेवील, किंवा

(क) कोणताही खोटा स्टांप करण्याकरितां कोणताही छाप, पत्रा, साधन किंवा पदार्थ करील, किंवा कायदेशीर सबबीवांचून आपल्या कबज्यांत ठेवील,

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे, व हा दंड दोनशें रुपयांपर्यंत करण्याचा अख़्त्यार आहे.

"(२). कोणताही खोटा स्टांप करण्याकरितां कोणत्याही मनुष्याच्या कबज्यांत असणारा सदरहू प्रकारचा कोणताही स्टांप, छाप, पत्रा, साधन किंवा पदार्थ धरण्याचा अधिकार आहे, व ते गुन्हेगारीबद्दल सरकारांत जमा होतील असें समजावें.

"(३) या कलमांत 'खोटा स्टांप' याचा अर्थ, टपालाच्या हांशिलाचा दर दर्शविण्याकरितां सरकारानें काढल्यासारखा खोट्या रीतीनें दिसणारा कोणताही स्टांप, किंवा त्या कारणाकरितां सरकारानें काढलेल्या कोणत्याही स्टांपाची कागदावर किंवा इतर रीतीनें केलेली हुबेहूब नकल, किंवा अनुकृति, किंवा प्रतिमा असा समजावा: आणि

"(४) या कलमांत व त्याचप्रमाणें कलमें २९१ ते २६३ ह्या नऊ कलमांतही, टपालाच्या हांशिलाचा दर दर्शविण्याकरितां काढलेल्या कोणत्याही स्टांपाच्या बाबतींत अगर त्याच्या संबंधानें 'सरकार' या शब्दाचा उपयोग केला असेल तेव्हां त्यांत, १७ व्या कलमांत कसाही ठराव असला तथापि, ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांत व त्याचप्रमाणें मलिका माआझमांच्या राज्याच्या कोणत्याही भागांत किंवा कोणत्याही परकी देशांत राज्याधिकार चालविण्याचा अधिकार कायद्यानें मिळाला असेल त्या मनुष्याचा किंवा मनुष्यांचा समावेश होतो असें समजावें."

सन १८६० चा आक्ट ४५ याच्या २९४ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

३. सदरहू कायद्याच्या २९४ व्या कलमाच्या बदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे; तें येणेंप्रमाणें:—

बीभत्स कृत्यें व गाणीं.

"२९४. जो कोणी, दुसऱ्यांस त्रास होईल अशा रीतीनें,

(अ) कोणत्याही सार्वजनिक जागेंत कोणतेंही बिभत्स कृत्य करील किंवा,

(ब) कोणत्याही सार्वजनिक जागेंत किंवा जागेजवळ कोणतेंही बीभत्स गाणें गाईल, किंवा तशी लावणी ह्मणेल किंवा तसे शब्द उच्चारील,

त्यास दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व हा कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अधिकार आहे, किंवा दंडाची शिक्षा दिली पाहिजे, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत."

सन १८६० चा आक्ट ४५ याच्या ४७७व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

४. सदरहू कायद्याच्या ४७७ व्या कलमानंतर पुढील कलम दाखल केलें पाहिजे; तें येणेंप्रमाणें:—

हिशेब खोटा करणें.

"४७७ अ. जो कोणी, कारकून, अमलदार किंवा नौकर असून, किंवा कारकुनाच्या, अमलदाराच्या किंवा नौकराच्या कामावर लावलेला असून, किंवा त्याचें काम करीत असून, आपणास नौकरीस ठेवणाराचें किंवा त्याच्या कबज्यांत असणारें, किंवा आपणास नौकरीस ठेवणाराकरितां किंवा त्याच्या वतीनें आपणाकडे आलेलें कोणतेंही बूक, कागद, लेख, किंमतीचें तारण किंवा हिशोब यांचा, बुद्ध्या व कपटाच्या इराद्यानें नाश करील, त्यांत फेरफार करील, तीं छिन्नविच्छिन्न करील किंवा खोटीं होत असें करील, किंवा असें कोणतेंही बूक, कागद, लेख, किंमतीचें तारण किंवा हिशोब यात बुद्ध्या व कपटाच्या इराद्यानें, कोणतीही खोटी नोंद करील किंवा करण्यास साह्य करील किंवा तसें कोणतेंही बूक, कागद, लेख, किंमतीचें तारण किंवा हिशोब यांत किंवा यांतून कोणतीही मुद्याची बाबत गाळील किंवा फिरवील किंवा गाळण्यास किंवा फिरविण्यास साह्य करील, त्यास दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ही कैद सात वर्षेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, किंवा दंडाची शिक्षा दिली पाहिजे, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

"व्याख्या.—या कलमाखालील कोणत्याही चार्जमध्यें कपट करण्याचा सामान्य इरादा लिहिणें पुरे आहे; अमुक मनुष्याच्या संबंधानें किंवा पैक्याच्या अमुक रकमेच्या संबंधानें कपट करण्याचा इरादा होता असें किंवा तो अपराध अमुक दिवशीं करण्यांत आला असें न लिहिलें तरी चालेल."

## सन १८६४ चा आक्ट ६ वा.

सन १८६४ चा आक्ट ६, याच्या २, ३, व ४ ह्या कलमां-ऐवजीं नवीन कलमें दाखल करणें.

९. सन १८६४ चा आक्ट ६ (फटके मारण्याची शिक्षा कांहीं प्रसंगीं ठरविण्याचा अधिकार देण्याविषयीं आक्ट) याच्या २,३ व ४ ह्या कलमांच्या ऐवजीं पुढील कलमें दाखल केलीं पाहिजेत; तीं येणेंप्रमाणें:—

अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्यांत इतर शिक्षा सांगितल्या आहेत त्यांचे बदला फटक्यांची शिक्षा करण्यालायक गुन्हे.

"२. जो कोणताही मनुष्य खालीं लिहिलेल्या गुन्ह्यांपैकीं कोणताही गुन्हा करील त्याला, तो त्या गुन्ह्याबद्दल हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याअन्वयें ज्या शिक्षेस पात्र असेल, त्या शिक्षेच्या बदला फटके मारण्याची शिक्षा करण्याचा अधिकार आहे; ते गुन्हे वितपशीलः—

### वर्ग अ.

(१) सदर्हू कायद्याचे ३७८ व्या कलमांत सांगितल्या प्रकारची चोरी;

(२) सदर्हू कायद्याचे ३८० व्या कलमांत सांगितल्या प्रकारची घरांतील, तंबूंतील किंवा नावेंतील चोरी;

(३) सदर्हू कायद्याचे ३८१ व्या कलमांत सांगितल्या प्रकारची कारकुनानें किंवा नोकरानें केलेली चोरी;

(४) सदर्हू कायद्याचे ३८२ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें जीव घेण्याची अगर दुखापत करण्याची तयारी करून केलेली चोरी;

### वर्ग ब.

(५) सदर्हू कायद्याचे ३८८ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें भय घालून जुलमानें घेणें;

(६) सदर्हू कायद्याचे ३८९ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें जुलमानें घेणें हा अपराध करावयाकरितां कोणा मनुष्यास अपराध केल्याच्या आरोपाचें भय घालणें;

### वर्ग क.

(७) सदर्हू कायद्याचे ४११ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें लबाडीनें चोरीचा माल घेणें;

(८) सदर्हू कायद्याचे ४१२ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें दरवडा घालून चोरलेला माल लबाडीनें घेणें;

### वर्ग ड.

(९) या कलमांत ज्या गुन्ह्याबद्दल फटक्यांची शिक्षा सांगितली आहे तसा गुन्हा करण्यासाठीं सदर्हू कायद्याचे ४४३ वे व ४४९ वे कलमांत सांगितल्याप्रमाणें छपून बसून घराविषयीं आगळीक करणें किंवा घर फोडणें;

(१०) या कलमांत ज्या गुन्ह्याबद्दल फटक्यांची शिक्षा सांगितली आहे तसा गुन्हा करण्यासाठीं सदर्हू कायद्याचे ४४४ वे व ४४६ वे कलमांत सांगितल्याप्रमाणें छपून बसून रात्रीं घराविषयीं आगळीक करणें किंवा रात्रीस घर फोडणें;

कलम २ ह्यांत सांगितलेल्या गुन्ह्याची दुसऱ्यानदां शाबिती झाली असतां इतर शिक्षेखेरीज आणखी फटक्यांची शिक्षा करण्याचा अधिकार.

"३. सदरील शेवटले कलमांत सांगितलेल्या गुन्ह्यांपैकीं कोणतेही गुन्ह्याची शाबिती कोणा मनुष्यावर पूर्वीं झाली असून त्यावर तशाच गुन्ह्याची किंवा गुन्ह्यांच्या त्याच वर्गांत समावेश झालेल्या कोणत्याही गुन्ह्याची पुनः शाबिती झाली असतां हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा ह्याअन्वयें त्या गुन्ह्याबद्दल ज्या इतर शिक्षेस

तो पात्र असेल त्या शिक्षेच्या बदला, किंवा त्या शिक्षेखेरीज आणखी, त्याला, फटके मारण्याची शिक्षा करण्याचा अधिकार आहे.

दुसऱ्यानें शाबिती झालीअसतां दुसरे शिक्षेखेरीज आणखी फटके मारण्याची शिक्षा करण्यालायक गुन्हे.

"४. खालीं लिहिलेले गुन्ह्यांपैकीं कोणतेही गुन्ह्याची शाबिती कोणा मनुष्यावर पूर्वीं झाली असून त्यावर तशाच गुन्ह्याची किंवा गुन्ह्यांच्या त्याच वर्गांत समावेश झालेल्या कोणत्याही गुन्ह्याची पुनः शाबिती झाली असतां, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा ह्याअन्वयें ज्या इतर शिक्षेस तो पात्र असेल, त्या शिक्षेखेरीज आणखी, त्याला, फटके मारण्याची शिक्षा करण्याचा अधिकार आहे; ते गुन्हे बितपशील :—

## वर्ग अ.

(१) हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १९३ व्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र होईल अशा रीतीनें खोटी साक्ष देणें किंवा खोटा पुरावा बनविणें;

(२) सदर्हू कायद्याचे १९४ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, ज्या अपराधास मरणाची शिक्षा सांगितली आहे तसा अपराध कोणावर शाबित व्हावा ह्याकरितां खोटी साक्ष देणें अगर खोटा पुरावा बनविणें;

(३) सदर्हू कायद्याचे १९५ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, ज्या अपराधास काळे पाण्यावर पाठविण्याची अगर कैदेची शिक्षा सांगितली आहे तसा अपराध कोणावर शाबित व्हावा ह्याकरितां खोटी साक्ष देणें अगर खोटा पुरावा बनविणें;

## वर्ग ब.

(४) सदर्हू कायद्याचे २११ व्या व ३७७ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, सृष्टीच्या रीतीच्या विरुद्ध संभोग केल्याचा खोटा चार्ज कोणा मनुष्यावर घालणें;

## वर्ग क.

(५) सदर्हू कायद्याचे ३५४ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, स्त्रीस लज्जा वाटून तिच्या मनास धक्का बसावा या इराद्यानें तिच्या अंगावर जाणें अगर तिजवर अन्यायाची बळजोरी करणें;

(६) सदर्हू कायद्याचे ३७५ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, जबरीचा संभोग;

(७) सदर्हू कायद्याचे ३७७ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, सृष्टीच्या रीतीच्या विरुद्ध संभोग;

## वर्ग ड.

(८) सदर्हू कायद्याचे ३९० व्या व ३९१ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, जबरीची चोरी अगर दरवडा;

(९) सदर्हू कायद्याचे ३९३ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, जबरीची चोरी करण्याचा प्रयत्न करणें;

(१०) सदर्हू कायद्याचे ३९४ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, जबरीची चोरी करितांना आपखुषीनें दुखापत करणें.

## वर्ग इ.

(११) सदर्हू कायद्याचे ४१३ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, चोरीचा माल घेण्याची अगर तशा मालाचा व्यापार करण्याची वहिवाट असणें.

वर्ग फ.

( १२ ) सदर्हू कायद्याचे ४६३ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, बनाऊ लेख करणें;

( १३ ) सदर्हू कायद्याचे ४६६ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, बनाऊ कागद करणें;

( १४ ) सदर्हू कायद्याचे ४६७ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, बनाऊ दस्तऐवज करणें;

( १५ ) सदर्हू कायद्याचे ४६८ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, ठकबाजी करावयाकरितां बनाऊ लेख करणें;

( १६ ) सदर्हू कायद्याचे ४६९ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, कोणा मनुष्याच्या अब्रूची नुकसानी करावयाकरितां बनाऊ लेख करणें.

वर्ग ग.

( १७ ) ह्या कलमांत ज्या गुन्ह्याबद्दल फटक्यांची शिक्षा सांगितली आहे तसा गुन्हा करण्यासाठीं सदर्हू कायद्याचे ४४३ व्या व ४४५ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, छपून बसून घराविषयीं आगळीक करणें किंवा घर फोडणें.

( १८ ) ह्या कलमांत ज्या गुन्ह्याबद्दल फटक्यांची शिक्षा सांगितली आहे तसा गुन्हा करण्यासाठीं सदर्हू कायद्याचे ४४४ व्या व ४४६ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, छपून बसून रात्रीं घराविषयीं आगळीक करणें किंवा रात्रीस घर फोडणें."

सन १८६४ चा आक्ट ६ वा कलम ५, ह्यांत खुलासा जास्त दाखल करणें.

६. सदरहू आक्टाच्या ५ व्या कलमांत खालील खुलासा जास्त दाखल केला पाहिजे तो येणेंप्रमाणें :—

"खुलासा.—ह्या कलमांत, 'अल्पवयी गुन्हेगार' ह्या संज्ञेचा अर्थ, जो गुन्हेगार कोर्टाच्या मतें सोळा वर्षांहून कमी वयाचा असेल, तो गुन्हेगार, असा समजावा; आणि ह्या बाबतींत कोर्ट जो निकाल सांगेल तो अखेरचा व निरुत्तर समजला पाहिजे."

सन १८६६ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट.

सन १८६६ चा आक्ट १४ वा, ह्याच्या ६५ व्या कलमापुढें एक नवीन कलम दाखल करणें.

७. सन १८६६ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट, ह्याच्या ६५ व्या कलमापुढें खालील कलम दाखल केलें पाहिजे; तें येणेंप्रमाणें :—

खोटे अगर पूर्वी वापरलेले स्टांप लाविलेल्या जिन्नसांसंबंधानें पोस्ट आफिसाचा अधिकार.

"६६. (१) ब्रिटिश इंडियाच्या हद्दीच्या बाहेरील कोणत्याही जागेहून कोणतेंही पत्र किंवा इतर जिन्नस पोस्टांतून आलेला असून—

(अ) त्या पत्रावर किंवा जिनसावर खोटा हांशिलाचा स्टांप ह्मणजे, कोणत्याही हांशिलाच्या स्टांपाची हुबेहूब नकल, किंवा अनुकृति किंवा प्रतिमा लाविलेली असली, किंवा

(ब) इतर कोणत्याही पत्राचें किंवा जिन्नसाचें अगाऊ हांशील देण्यासाठीं वापरलेल्या कोणत्याही हांशिलाचा स्टांप त्या पत्रावर किंवा जिन्नसावर लावून त्याचें हांशील आगाऊ दिल्यासारखें केलेलें असलें,

तर, तें पत्र किंवा तो जिन्नस ज्या पोस्ट आफिसांत आलेला असेल तें पोस्ट आफिस ताब्यांत असणाऱ्या अमलदारानें, तें पत्र किंवा तो जिन्नस ज्या मनुष्याच्या नांवावर आलेला असेल, त्या मनुष्यास एक नोटीस पाठवून, त्यानें आपण जातीनें किंवा मुखत्यारामार्फत तें पत्र किंवा तो जिन्नस घेण्यासाठीं विवक्षित वेळाच्या आंत त्या पोस्ट आफिसांत हजर व्हावें, असें कळविलें पाहिजे.

(२) तें पत्र किंवा तो जिन्नस ज्या मनुष्याच्या नांवावर आला असेल तो मनुष्य अगर त्याचा मुखत्यार जर, सदहू प्रकारच्या नोटिशींत लिहिलेल्या वेळाच्या आंत पोस्ट आफिसांत हजर झाला, आणि त्यानें तें पत्र किंवा तो जिन्नस पाठविणाराचें नांव व त्याचा पत्ता तें आफिस ताब्यांत असणाऱ्या अमलदारास कळविण्याचें आणि त्या पत्राच्या किंवा जिन्नसाच्या ज्या भागावर पत्ता व तो खोटा स्टांप किंवा पूर्वी उपयोग केलेला स्टांप असेल तो भाग अगर तें पत्र किंवा तो जिन्नस त्या स्टांपापासून निराळा करतां येण्यासारखा नसल्यास तें सगळें पत्र किंवा तो सगळा जिन्नस त्या अमलदारास परत देण्याचें कबूल केलें, तर, त्यास किंवा त्याच्या मुखत्यारास तें पत्र किंवा तो जिन्नस दिला पाहिजे.

(३) जर तो मनुष्य अगर त्याचा मुखत्यार त्या नोटिशींत सांगितलेल्या वेळाच्या आंत पोस्ट आफिसांत हजर झाला नाहीं किंवा त्या वेळाच्या आंत हजर राहून त्यानें तें पत्र किंवा तो जिन्नस पाठविणाराचें नांव व पत्ता कळविण्यास अगर पोट कलम (२) यांत सांगितल्याप्रमाणें तें पत्र किंवा तो जिन्नस अगर त्याचा भाग परत देण्यास नाकारिलें, तर, तें पत्र अगर तो जिन्नस त्याच्या स्वाधीन न करितां त्याची व्यवस्था गव्हर्नर जनरल इन कौन्सिल हे सांगतील त्याप्रमाणें केली पाहिजे.

( ४ ) ह्या कलमाच्या कारणांसाठीं "हांशिलाचा स्टांप" ह्या संज्ञेंत मलिका माआज्ञमांच्या मुलुकाच्या कोणत्याही भागाचा अगर कोणत्याही परकी देशाचा हांशिलाचा दर किंवा ड्यूटी दर्शविणाऱ्या कोणत्याही छापलेल्या, वठविलेल्या किंवा लाविलेल्या स्टांपाचा समावेश होतो असें समजावें.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.